REGISTERED No. B3154.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ॥ —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख १८ जून १९४७ | अंक २५

★ कौटुंबिक आनंद ! ★

—कुटुंबाची भविष्यकाळची योग्य तरतूद केल्यानेंच हा आनंद उपभोगतां येतो.—

## वेस्टर्न इंडिया

कंपनीची फायदेशीर विमा योजना पसंत करून ही तरतूद करून ठेवा.

सर्वांना पसंत अशा योजना आहेत.

माहितीसाठीं लिहा अथवा भेटा.

—मॅनेजर:—

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,

सातारा.

पुणें शाखा कचेरी:—कर्वे वाडा, लक्ष्मी पथ, बेलबाग.




## साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्यतितका ताजा माल गिऱ्हाइकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-
सुती — गरम — रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**बेलापूररोडचें श्रीरामपूर झालें**—बेलापूररोड (ता. बेलापूर, जि. अहमदनगर) या गांवाचें नांव आतां श्रीरामपूर असें ठेवण्यांत आलें आहे.

**ओरिसाच्या राजधानीसाठी मदत**—हिंदुस्थान सरकारनें ओरिसाच्या नव्या राजधानीसाठी १ कोटी, ५२ लाख रुपये मदत देण्याचें ठरविलें आहे असें समजतें. ओरिसा प्रांत १९३६ सालीं निर्माण करण्यांत आला, त्यावेळीं याच कारणासाठीं ३० लाख रुपयांची मदत देण्यांत आली होती.

**इराणला अमेरिकन शस्त्रास्त्रें**—पर्शिआमधील अमेरिकन लष्करी शिष्टमंडळाचे पुढारी जनरल श्वार्टकॉफ वॉशिंग्टनला परतले आहेत. इराणला अमेरिकेनें युद्धकाळांत जी लष्करी सामग्री पुरविली ती इराणकडे राहूं देण्याविषयींच्या वाटाघाटी ते करणार असल्याची बातमी आहे.

**परदेशी धान्याची आयात**—तुर्कस्थानहून ६,४७० टन गहूं घेऊन आलेलें एक जहाज नुकतेंच मुंबईला आलें. येत्या पंधरवड्यांत ब्रह्मदेशांतून तांदूळ घेऊन येणारीं तीन जहाजें मुंबईला येतील असें समजतें. मे महिन्यांत हिंदुस्थानांत परदेशी धान्य घेऊन एकंदर १४ बोटी आल्या. त्यांपैकी ७ अमेरिकेहून आल्या. आयात धान्यांत गहूं, तांदूळ व मका हीं धान्यें आहेत.

**सिलोनची नड भागविली**—हिंदुस्थानला आग्नेय आशियांतील तांदुळाचा जो हिस्सा मिळाला होता त्यांतील ४ हजार टन तांदूळ हिंदुस्थान सरकारनें सिलोनला उसना म्हणून देण्याचें कबूल केलें आहे. सिलोनमधील तांदुळाची तातडीची नड भागल्यावर जुलै अखेर सिलोननें हा तांदूळ परत करावयाचा आहे.

**वॉलेस ह्यांचा इषारा**—अमेरिकेचे सध्याचे रिपब्लिकन पुढारी जागतिक अर्थव्यवस्थेसंबंधीं अज्ञानी आहेत, त्यामुळें अमेरिकेवर आर्थिक गंडांतर कोसळणार हें निश्चितच आहे, असें मि. वॉलेस यांनीं बोलून दाखविलें आहे.

**विमान अपघातांची चौकशी करा**—गेल्या कांहीं महिन्यांत अमेरिकेंतील प्रवासी व वहातुकीच्या विमानांचे जे अपघात झाले त्यांची कसून चौकशी करण्याची मागणी अमेरिकन काँग्रेसच्या एका सभासदानें केली आहे.

**पंचगणीला विमानतळ**—पंचगणीच्या जवळ असणाऱ्या पठारावर लवकरच एक विमानतळ उभारण्यांत येणार असल्याची बातमी आहे. दक्षिणेकडे जाणाऱ्या, वायव्येकडे जाणाऱ्या अगर किनाऱ्यानें जाणाऱ्या विमानांना ही जागा फार सोयीची पडेल, म्हणून ती पसंत करण्यांत आली आहे.

**हिंदुस्थानसाठी इंग्लिश रेल्वे एंजिनें**—हिंदुस्थानसाठीं २०० मोठीं रेल्वे एंजिनें बांधण्याचें काम तीन बड्या इंग्लिश कारखान्यांकडे सोंपविण्यांत आल्याची बातमी आहे. या एंजिनांच्या बांधणीला १९४९ च्या पावसाळ्यांत प्रारंभ होणार असून खर्च ६० लाख पौंड येणार आहे.

**विजेनें ब्लँकिटाची ऊब नियंत्रित होणार**—झोपी जातांना लोक पांघरूण घेतात. कित्येकांना त्याची ऊब हवी असते तर कित्येकांना नको असते. एकाच बिछान्यावर निजणाऱ्या पतिपत्नींत त्यामुळें कित्येक प्रसंगीं तंटा उपस्थित होतो. ही अडचण दूर करण्याची युक्ती एका इंग्रज फर्मनें शोधून काढली आहे. ब्लँकिटाचें उष्णतामान विजेच्या सहायानें नियंत्रित करण्याची त्या फर्मची कल्पना आहे. विजेचें स्विच दाबून एकाच ब्लँकिटाच्या डाव्या व उजव्या बाजू इच्छित अशा वेगवेगळ्या उष्णतामानांत त्यामुळें ठेवता येतात.

**अन्न खाणार, का चित्रपट पहाणार?**—अमेरिकेंतील आपली आयात कमी करून डॉलर्सची बचत करण्यासाठी ग्रेट ब्रिटननें धूम्रपानावरील कर वाढविला आहे. परंतु तेवढ्यानें भागणार नाहीं. अमेरिकेंतून बऱ्याच अन्नाची ग्रेट ब्रिटनमध्यें आयात होते, त्यांत कपात होऊं नये यासाठी इतर कांहीं प्रकारच्या अमेरिकन खरेदींत काटकसर करतां येईल काय, या दृष्टीनें ब्रिटिश विचारवंतांची पहाणी चालू आहे. ग्रेट ब्रिटन अमेरिकेला दरसाल पेट्रोलच्या खरेदीसाठी १२ कोटि डॉलर्स देतो, परंतु मध्यपूर्वेंत पेट्रोल खरेदी करून त्याची किंमत डॉलर्स ऐवजी पौंडांत देण्याची शक्यता असूनहि तसें करणें अँग्लो-अमेरिकन कर्ज कराराच्याविरुद्ध होणार आहे. अमेरिकन चित्रपटावर ग्रेट ब्रिटन दरसाल ७ कोटि डॉलर्स खर्च करतो, त्यांत मात्र बचतीस वाव असल्याचें सांगण्यांत येत आहे. परंतु फक्त अमेरिकन चित्रपटांच्या आयातीवर नियंत्रण घालणें अँग्लो अमेरिकन कर्ज करारास सोडून होईल. म्हणून, अमेरिकनबरोबर फ्रेंच व इतर चित्रपटांच्याहि आयातीवर बंधनें बसवावीं लागतील. अमेरिकेंतील चित्रपटांची ब्रिटिश बाजारपेठ अशा रीतीनें कमी झाली म्हणजे ब्रिटिश चित्रपटांना अमेरिकेंत तरी वाव कोण मिळूं देणार? अमेरिकेंतून होणारी अन्नाची आयात टिकविण्यासाठीं ब्रिटिश चित्रपटांच्या अमेरिकेंतील खपास धोका आला तरी तो पत्करण्यांत यावा असें सुचविलें जात आहे.

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. by an order from the Examiner of Capital Issues, Finance Department, New Delhi of which a complete copy is open to public inspection at the Head office of the Company.

It must be distinctly understood that in giving the consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

# धी लोकमान्य मिल्स बार्शी लि.

**अधिकृत भांडवल : : रु. ३०,००,०००**

**विक्रीस काढलेले शेअर्स १२,८००**

★ प्रत्येकीं रुपये १२५ चे व प्रत्येक शेअरला अर्जासोबत डिपॉझिट रु. १० व अलॉटमेंटनंतर रु. १५ व पुढें दोन महिन्यापेक्षां कमी नाहीं अशा अंतरानें रु. २० चा हप्ता याप्रमाणें भरावयाचे.

★ पूर्वीच्या शेअर होल्डरांस प्रत्येक चार शेअरमागें पांच शेअर या प्रमाणांत शेअर घेण्याचा हक्क आहे. व तो त्यांनीं ता. ३०-६-४७ पर्यंत मिल कंपनीस कळवावा. वरीलप्रमाणें अग्रहक्कानें न घेतलेले शेअर्स मे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ठरवितील त्या प्रमाणांत स्वीकारले जातील.

शेअरच्या अर्जाचे फॉर्म कंपनीच्या ऑफिसांत मिळतील.

भगवंत पंढरीनाथ सुलाखे
मॅनेजिंग एजंट
फॉर सुलाखे आणि कंपनी, बार्शी.

# अर्थ

बुधवार, ता. १८ जून, १९४७



संस्थापक

प्रा. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे
वा. वर्गणी टं. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## ठेवीदारांच्या ठेवींचा विमा

### अमेरिकेंतील डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची उपयुक्त कामगिरी

काहीं महिन्यांपूर्वी हिंदी बँकिंगच्या क्षेत्रांत चलबिचल निर्माण होऊन कांहीं बँकांना आपले व्यवहार बंद ठेवावे लागले. त्या कारणानें, कित्येक ठेवीदारांचें प्रत्यक्ष नुकसान झालें व कित्येकांची गैरसोय झाली. बँकांकडून घेतलेल्या कर्जावर अवलंबून असलेल्या व्यापारी व्यवहारांचीहि कुचंबणा झाली. अशा परिस्थितीवर कांहीं उपाययोजना नाहीं काय; असा विचार कित्येकांचे मनांत येऊन गेला असेल. अमेरिकेनें विम्याच्या तत्त्वाचा उपयोग ह्या कामीं केला असून तेथील फेडरल डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन बँकांतील ठेवींचा विमा उतरते आणि ज्या बँका ठेवीदारांच्या ठेवी देऊं शकत नाहींत, त्यांची भरपाई ती कॉर्पोरेशन स्वत: करते. प्रत्येकीं कमाल ५,००० डॉलर्सपर्यंतच्या रकमेची जबाबदारी ती अशा रीतीनें स्वीकारते. ह्या कॉर्पोरेशनची स्थापना १९३४ सालीं झाली व तिच्या संरक्षण छत्राखालीं १३,००० बँकांतील ठेवी आहेत. कॉर्पोरेशनच्या १३ वर्षांच्या इतिहासांत तिनें विमा उतरलेल्या ३९८ बँकांच्या १३ लक्ष ठेवीदारांच्या २६ कोटि डॉलर्सच्या ठेवी स्वत: परत दिल्या. ठेवीदारांना त्यामुळें बँका बुडण्याची भिती वाटण्याचें कारण नाहीं; बँक बुडाली तर फे. डि. इं. कॉर्पोरेशन ठेव परत देण्यास बांधलेली आहेच ! फक्त एकच त्यास मर्यादा आहे आणि ती म्हणजे प्रत्येक ठेवीदाराच्या कमाल ५,००० रुपयांपर्यंतच्या ठेवीच्या परतफेडीचीच जबाबदारी ती पत्करते; ज्यास्त रकमेची नाहीं.

गेलीं कांहीं वर्षें अमेरिकन बँकांना चांगलीं गेलीं, त्यांचीं येणीं तरती राहिलीं, किंमती एकसारख्या चढत होत्या, उद्योगधंदे तेजींत होते आणि जावक ठेवीपेक्षा आवक ठेवीच अधिक होत्या. त्या कारणानें, ज्या बँकेचा विमा उतरलेला आहे अशा एकहि बँकेच्या ठेवीदाराची ठेव गेल्या तीन वर्षांत धोक्यांत आली नाहीं. अर्थात्, ही परिस्थिति कायम टिकणें शक्य नाहीं. उद्योगधंद्यांना केव्हांतरी मंदी येणार आणि तेथील बँकांना फे. डि. इं. कॉर्पोरेशनची मदत लागणार हें उघड आहे. बँका बुडण्याचें प्रमाण कमी होत चाललें, तशी कॉर्पोरेशनवरील जोखीम मात्र वाढत चालली आहे. विमा उतरलेल्या बँकांकडे १९३९ सालीं ५,७०० कोटि डॉलर्सच्या ठेवी होत्या, त्यांपैकीं २,४०० कोटि डॉलर्सची जोखीम कॉर्पोरेशननें पत्करलेली होती. १९४५ मधील हेच आकडे अनुक्रमें १५,८०० कोटि डॉलर्स व ६,६०० कोटि डॉलर्स असे आहेत. ह्या ठेवींच्या व जोखमीच्या प्रमाणांत फे. डि. इं. कॉर्पोरेशनचें भांडवल व तिचेजवळ सांचलेला वाढावा ह्यांत भर पडत चाललेली नाहीं. ३१ डिसेंबर १९४५ अखेर त्यांची बेरीज ९३ कोटि डॉलर्स होती. हा आकडा दिसावयास मोठा दिसला तरी विमा उतरलेल्या बँकांच्या एकूण ठेवींच्या मानानें तो फारच अल्प आहे असें आढळून येईल. बँका जोपर्यंत नफ्यांत चालल्या आहेत तोंपर्यंत विमा फंडाला आपली वर्गणी देण्यास त्या नाखूष नसतात. कॉर्पोरेशनची स्वत:ची परिस्थिति सुधारण्यास हाच काळ सोइस्कर आहे. बँकिंगच्या क्षेत्रांत खळबळ उडाली तरी कॉर्पोरेशनच्या संरक्षणाची ठेवीदारांनाहि निश्चिंती असते. ठेवींच्या विम्याची योजना अमलांत येण्याचे प्रारंभीं अमेरिकन काँग्रेसनें कायदा करून कॉर्पोरेशनला २९ कोटि डॉलर्सचें भांडवल पुरविलेलें आहे. आरंभापासूनच पुरेसा विमा फंड उपलब्ध असावा म्हणून ही रकम मंजूर करण्यांत आली होती. त्यांत वाढाव्याचे ६४ कोटि डॉलर्स मिळविले म्हणजे वरील ९३ कोटि डॉलर्सची बेरीज होते. काँग्रेसनें सुरवातीस दिलेल्या भांडवलाची परतफेड केली, म्हणजे डिपॉझिट इन्शुअरन्स फंड हा बँकांचा एक म्युच्युअल फंड बनेल.

अमेरिकेंतील बँकांकडील ठेवी वाढत चालल्या आहेत ह्या कारणानें त्यांच्या भांडवलाचें ठेवींशीं पडणारें प्रमाण एकसारखें उतरत चाललें आहे. १८७५ सालीं हें प्रमाण ३५% होतें तें आतां ५·७% वर आलें आहे. त्या प्रमाणांत ठेवीदारांची सुरक्षितता कमी होत चालली आहे. अर्थात्, बँकांनीं गुंतविलेले पैसेहि आतां भरपूर तरते आहेत. ठेवींच्या विम्याचें संरक्षण आतां एकूण १७,१९८ बँक कचेऱ्यांना मिळत आहे.

आयुर्विमा कंपनी एकाद्या मनुष्याचा विमा स्वीकारण्यापूर्वी त्याची डाक्टरी तपासणी व इतर चौकशी करते. तद्वतच फे. डि. इं. कॉर्पोरेशन विमेच्छू बँकांची तपासणी व चौकशी करते. बँकेचा आर्थिक इतिहास, तिचें भांडवल पुरेसें आहे किंवा नाहीं, तिच्या व्यवहाराचा किफायतशीरपणा, व्यवस्थेचा दर्जा, बँक ज्या क्षेत्रांत व्यवहार करते तेथील समाजाच्या गरजा व सोई, कॉर्पोरेशनमध्यें विमा उतरण्याचा तिला तिच्या आर्टिकल्सनें अधिकार दिलेला आहे किंवा नाहीं, इत्यादि गोष्टींची सूक्ष्मपणें छाननी केली जाते. विमा उतरलेल्या कच्च्या बँकांचें विमा उतरलेल्या भक्कम बँकांशीं एकत्रीकरण सुलभ व्हावें ह्यासाठीं कॉर्पोरेशनला काँग्रेसनें कर्ज देण्याचा व मालमत्ता खरेदी करण्याचा अधिकार दिलेला आहे. एकत्रीकरणामुळें कच्च्या बँकेच्या कर्जदारांच्या आर्थिक व्यवहारांस धक्का बसत नाहीं आणि समाजाचे व्यवहार सुरळीत चालू राहूं शकतात. कच्च्या बँकेचें भक्कम बँकेशीं एकत्रीकरण झालें म्हणजे तिच्या ५,००० डॉलर्सवरील रकमेच्या ठेवीदारांचें हितहि आपोआपच रक्षिलें जातें. एकत्रीकरणाचे संबंधांत कॉर्पोरेशनचे हातीं येणाऱ्या मालमत्तेस योग्य किंमत येऊं शकते, कारण कॉर्पोरेशन त्यासाठीं वाट पाहाण्यास समर्थ असते. तेव्हां, कच्च्या बँकेसाठीं रिसीव्हर नेमण्यापेक्षां एकत्रीकरणासाठीं तिला पैसे कर्जाऊ देणें सर्वच दृष्टींनीं श्रेयस्कर ठरतें.

अमेरिकेंतील आर्थिक स्थैर्य टिकून रहाणें ही गोष्ट केव्हांहि कॉर्पोरेशनच्या दृष्टीनें इष्ट व अगत्याची आहे. बँका बुडण्याची लाट आली म्हणजे ठेवीदारांचें नुकसान होतें आणि त्याचवेळीं मंदी येते. बँका बुडण्याचा प्रसंगच टळावा असा ठेवींच्या विम्याचा स्वाभाविकच परिणाम होतो. तथापि विशिष्ट मर्यादेखालीं उद्योग-

बंधाची परिस्थिति येऊं नये हें पहाणें कॉर्पोरेशनला अगत्याचें असतें. १९४५ सालीं एकाहि बँकेचे बाबतींत रिसीव्हर नेमण्याची पाळी आली नाहीं आणि फक्त एकाच बँकेस कॉर्पोरेशनकडून कर्ज घेण्याची आवश्यकता भासली. ह्या कच्च्या बँकेचें दुसऱ्या एका बँकेशीं एकत्रीकरण घडवून आणलें गेलें त्यामुळें ६० लक्ष डॉलर्सच्या ठेवी असलेल्या ह्या बँकेच्या ठेवीदारांस नुकसान सोसावें तर लागलें नाहींच परंतु त्यांची एक दिवसहि गैरसोय झाली नाहीं.

कॉर्पोरेशन ठेवीदारांचें नुकसान कसें टाळते? ज्या बँका लिकिडेशनमध्यें जातात त्यांच्या ठेवीदारांस कमाल प्रत्येकीं ५,००० डॉलर्स पर्यंत रकमा देऊन टाकल्या जातात. बँकेचे कागदपत्र पाहून रकमा देण्यास तात्काळ प्रारंभ केला जातो. प्रत्येक डिपॉझिटरला व्यक्तिगत पत्र पाठवून पैशाची मागणी करण्याबद्दल सूचना दिली जाते आणि स्थानिक वर्तमानपत्रांत जाहीर नोटीसहि छापण्यांत येते. १८ महिन्यांचे आंत ठेवीदारानें कॉर्पोरेशनकडे मागणी केली नाहीं तर मात्र त्याचा पैसा मिळण्याचा अधिकार गमावला जातो.

बँक लिकिडेशनमध्यें जाण्यापेक्षा तिचें दुसऱ्या बँकेशीं एकत्रीकरण घडून येणें केव्हांहि हितकारक असतें. ह्या दृष्टीनें अशा एकत्रीकरणाच्या सुलभतेसाठी कर्जें देण्याचा अधिकार १९३५च्या बँकिंग अक्टानें दिलेला आहे. सामील होणाऱ्या बँकेची सहज पत्करण्याजोगी जिंदगी, समाविष्ट करणाऱ्या बँकेकडे वर्ग करण्यांत येते आणि समाविष्ट करणाऱ्या बँकेवर नव्यानें पडणारा बोजा तिला पेलतां यावा ह्या करतां सामील होणाऱ्या बँकेची जिंदगी जेवढ्या रकमेनें कमी पडेल तितकी रोख रकम कर्जाऊ दिली जाते; नंतर हा व्यवहार समजावून सांगणारे पत्र प्रत्यक्ष ठेवीदाराकडे धाडण्यांत येतें. दोन्ही बँकांच्या व्यवहारांत कोणत्याहि प्रकारचा खंड पडूं दिला जात नाहीं. कॉर्पोरेशनची जोखीम बँकांच्या एकत्रीकरणामुळें कमी होत असेल तरच ह्या भानगडींत ती पडेल हें उघड आहे.

ज्या बँकांच्या ठेवी परत देण्याची हमी कॉर्पोरेशन घेते, त्यांच्यावर तिची देखरेख असणें क्रमप्राप्तच ठरतें. तथापि, दरसाल प्रत्येक बँकेची तपासणी करणें अशक्यप्राय होतें. १९४५ सालीं कॉर्पोरेशननें ५,२८४ बँकांची तपासणी केली. १९४४ सालीं ती ६,३७८ बँकांची तपासणी करूं शकली होती. तपासणीसाठी लागणारा नोकर वर्ग कमी पडला हें त्याचें कारण आहे. १९४५ सालीं ११९ बँकांचे अर्ज कॉर्पोरेशननें आपल्या विमा योजनेंत घेण्यासाठी मंजूर केले. विमेदार बँकेनें अयोग्य वळणानें बँकिंगचा धंदा चालविला तर कॉर्पोरेशन तिचेवर दावा लावून योग्य तो निवाडा करवून घेते. बँकांना शाखा काढावयाच्या असल्या तरी कॉर्पोरेशनची त्याला संमति लागते. बँकांकडून दर सहामाहीस त्यांच्या ठेवींच्या तपशीलाचे तक्ते तीं मागविते. विम्याचा हप्ता ठरविण्यासाठी ही माहिती तिला लागते.

कॉर्पोरेशनच्या पटावर १९४५ अखेर १,१८४ अधिकारी व नोकर होते. १९४४ अखेर त्यांची संख्या १,५४६ होती. ही संख्या कमी होण्याचीं दोन कारणें आहेत: ( १ ) कित्येक नोकर युद्धकार्यांत गुंतले व ( २ ) कमी बँका बंद पडल्यामुळें लिकिडेशनचें काम कमी आलें.

१९४५ सालीं कॉर्पोरेशनचें उत्पन्न १२ कोटि डॉलर्स भरलें, त्यापैकीं ९३ कोटि डॉलर्स विमेदार बँकांच्या हप्त्यांचें होतें. बाकीची रकम कॉर्पोरेशनच्या गुंतवणुकीवरील व्याजाची व इतर उत्पन्नाची होती. खर्च फक्त ४० लक्ष डॉलर्स झाला, आणि बाकीची रकम वाढाव्यांत दाखल झाली. अमेरिकेंत एकूण बँकांपैकीं ९१.६% बँकांनीं ठेवींचा विमा उतरवलेला आहे. कॉर्पोरेशनच्या व्यवहारामुळें अमेरिकन बँकिंग व्यवसायास निदान मामुली काळांत तरी केवढें मोठें संरक्षण व स्थैर्य प्राप्त झालें आहे, ह्याची कल्पना वरील वृत्तांतावरून येईल. हिंदुस्थानांत अशा प्रकारची व्यवस्था करतां येईल काय, ह्याचा विचार रिझर्व्ह बँकेनें पुढाकार घेऊन जरूर करावा.

## स्फुट विचार

### विहिरींचे बाबत खेडेगांवांतील लोकांची अनास्था

मुंबई सरकारच्या खेडेगांवांच्या पाणीपुरवठ्याच्या पंचवार्षिक योजनेस शेतकऱ्यांचें सहाय अपेक्षेप्रमाणें मिळत नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. २०० पेक्षां ज्यास्त वस्ती असलेल्या प्रत्येक खेडेगांवास पिण्याच्या पाण्याची एक तरी विहीर असावी असा सरकारचा उद्देश आहे. शेतकऱ्यांनीं विहिरी खोदण्याचे कामीं सहाय केलें तर सरकारचा कार्यक्रम लवकर पुरा होईल अशी कल्पना होती. अर्थात्, प्रत्यक्ष खर्च सरकारच देणार होतें. तथापि ज्यांना ह्या विहिरींचा फायदा मिळणार, त्या लोकांनीं ह्या कामीं फारच थोडा उत्साह दाखविला आणि सहकार्य तर अतिशयच थोडें केलें. ३६४ विहिरींचे खोदाईबाबत शेतकऱ्यांचें सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न झाला, परंतु फक्त ९० विहिरींचेबाबत थोडेंफार सहकार्य लाभलें. बाकीच्या २७४ विहिरींचे संबंधांत शेतकऱ्यांनीं सहाय करण्याचें अजिबात नाकारलें म्हणून त्यासाठी टेंडरें मागविण्यांत आलीं. फक्त ६३ विहिरींच्या बांधकामासाठीच कंत्राटदार पुढें आले! २११ विहिरींच्या कामाचीं कोणीही टेंडरें भरलीं नाहींत. खेडेगांवांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न अत्यंत तातडीचा व गरजेचा असूनहि शेतकऱ्यांनीं त्याविषयीं इतकी अनास्था दाखवावी, हें ज्या मनोवृत्तीचें प्रतिबिंब आहे ती मनोवृत्ति आपल्या आर्थिक व सामाजिक प्रगतीस कितपत पोषक ठरेल?

### साबणाचें उत्पादन आणखी घटणार

मागणीच्या मानानें कॉस्टिक सोड्याचा पुरवठा फारच कमी असल्याकारणानें हिंदुस्थान सरकारनें साबण कारखानदारांना द्याव-याच्या कॉस्टिक सोड्यांत ६०% कपात केली आहे. हिंदुस्थानांत साबणाचे कारखाने वाढत आहेत, त्यांस स्थानिक वार्षिक ७,००० टनांचें उत्पादन व होणारी आयात हीं अपुरी पडत आहेत. कॉस्टिक सोड्याची सरकार-नियंत्रित किंमत हंड्रेडवेटास २२ रु. असली तरी एका वेळीं ती ११० रु. पर्यंत चढली होती. सरकारच्या नव्या निर्णयामुळें नव्या कारखानदारांना कॉस्टिक सोडा मिळूं शकणार नाहीं. हिंदुस्थानांत उभारावयाच्या कॉस्टिक सोड्याच्या सहा-सात कारखान्यांसाठीं यंत्रसामुग्री आयात करण्यास सरकारनें परवाने दिले आहेत आणि तीन कारखान्यांची यंत्रसामुग्री लवकरच दाखल होणार आहे. तरी पण आणखी दोन-तीन वर्षांत पुरवठ्याची परिस्थिति फारशी सुधारण्याची आशा नाहीं. गेल्या वर्षी हिंदुस्थानांत १,४५,००० टन साबणाचें उत्पादन झालें होतें. चालू वर्षी तें त्याच्या निम्म्या इतकें तरी होईल किंवा नाहीं ह्याची शंकाच आहे. साबणाचें रेशनिंग तूर्त तरी होत नाहीं, एवढें मात्र निश्चित.

## कारखान्यांत तयार झालेल्या मालाच्या घाऊक किंमतीचा इंडेक्स नंबर

(१) अन्न, (२) औद्योगिक कच्चा माल आणि (३) अर्धवट तयार माल ह्यांच्या किंमतींचे इंडेक्स नंबर प्रत्येक आठवड्यास हल्ली प्रसिद्ध होतात. त्यांत कारखान्यांत तयार झालेल्या मालाच्या घाऊक किंमतीच्या इंडेक्स नंबराची आतां भर पडत आहे. हा निदर्शक आकडा तयार करण्यासाठी १९ प्रकारच्या १०० जिनसांच्या किंमती विचारांत घेतल्या जातात. निवडलेल्या जिनसांत आयात होणारा व स्वदेशांत तयार होणारा अशा दोन्हीं प्रकारच्या जिनसांचा समावेश होतो. हातमागावरील उत्पादन विचारांत घेतलेलें नाहीं, कारण त्याच्या किंमतीचे आकडे वक्तशीर मिळणें कठीण आहे. (१) ताग, कापूस, रेयॉन, रेशीम व लोकर ह्यांचा तयार माल, (२) लोखंड, पोलाद, यंत्रसामग्री, मोटारी, इत्यादींचा तयार माल व (३) पायतणें, टायर्स, ट्यूब्स, सिमेंट, कागद, आगपेट्या, कांचसामान, साबण, रंग, सिगारेटस, दारू इत्यादि अशा तीन गटांच्या घाऊक किंमती आकडे तयार करतांना विचारांत घेतल्या जातात. ऑगस्ट, १९३९ अखेरचें वर्ष हें प्रमाणभूत धरलेलें आहे आणि त्या वर्षांतील उत्पादनास अनुसरून प्रत्येक गटांतील जिनसास महत्त्व दिलेलें आहे. एकूण १०० पैकी पहिल्या गटांतील जिनसांचें उत्पादन ६४, दुसऱ्या गटांतील १७ व तिसऱ्या गटांतील १९ असें आहे. ह्यावरून, ताग, कपास इत्यादींच्या जिनसांचें घाऊक किंमतीच्या इंडेक्स नंबरांतील महत्त्व लक्ष्यांत येईल. वरील प्रमाणें हिशेब केला असता, इंडेक्स नंबर खालीलप्रमाणें होतातः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष = | | | | १००.० |
| ५ एप्रिल १९४७ अखेरचा आठवडा = | | | | २७०.४ |
| १२ | " | " | " | २७१.२ |
| १९ | " | " | " | २६८.८ |
| २६ | " | " | " | २७०.१ |

---

## "महाद्वार" विमा अंक

हिंदुस्थानांत विम्याचा प्रसार अद्याप फारच थोडा झालेला आहे. बेकारी, आजार, इत्यादि सामाजिक आपत्तींचे विमे तर दूरच राहिले, परंतु साध्या आयुर्विम्याचासुद्धा प्रसार व्हावयास पुष्कळच वाव आहे. कोल्हापूर येथील "महाद्वार" मासिकानें खास विमा अंक काढून आपल्या वाचकांस विमाविषयक प्रश्नांचें स्वरूप समजावून सांगण्याची उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. विम्यासारख्या विषयावर शास्त्रशुद्ध विचार मांडणारे लेख मिळविण्याच्या अडचणींची ज्यांना कल्पना असेल, त्यांना श्री. व्यं. न. कुलकर्णी ह्यांचे उपक्रमाबद्दल कौतुकच वाटेल. हिंदुस्थानांतील विमा विषयास वाहिलेल्या इंग्रजी मासिकांतील कित्येक लेख सुद्धां बहुशीं अमेरिका व इंग्लंड येथील मासिकांमधील लेखांचीं रूपांतरें असतात. विम्याचा शास्त्रीय अभ्यास करणारे व त्यावर लेखन करणारे हिंदुस्थानांत फारच थोडे आहेत; तरी पण महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख तज्ज्ञांचें सहकार्य मिळवून व महाराष्ट्रीयेतरांकडूनहि लेख मिळवून, "महाद्वार"कारांनीं आपला ११० पृष्ठांचा विशेषांक उत्तम तऱ्हेनें सजविला आहे. आयुर्विमानिधींच्या गुंतवणुकीवरील नियंत्रणाबाबत श्री. गो. श्री. दिवाण एफ. आय. ए ह्यांचे विचार उद्बोधक आहेत. जहांगिर कमिटीच्या शिफारसीवर आधारलेल्या विमा-बिलांतील योजनांची चर्चा श्री. ज. गो. गडकरी, ह्यांनीं आपल्या लेखांत केली आहे. एजंटाच्या कमिशनमध्यें वाटा मागणाऱ्या विमेदारावर कडक टीका श्री. एस. एस. अली ह्यांनीं केली आहे, परंतु रिबेटची आत्मघातकी प्रथा एजंटच रूढ करतो हेंहि त्यांनीं सांगून टाकलें आहे. विमेदारांना आपल्यातर्फे डायरेक्टर निवडण्याचा अधिकार असूनहि त्याचा उपयोग नीट केला कसा जात नाहीं, ह्याचें वर्णन श्री. एन. एन. हर्षे, ए. आय. ए, ह्यांनीं केलें आहे. नफ्यासहित व नफ्याविरहित विमे आणि विमेदारांचे हितसंबंध ह्या लेखांत श्री. श्री. वा. काळे, संपादक अर्थ, ह्यांनीं विमा कंपन्यांचा किफायतशीरपणा कमी झाल्यामुळें विमेदारांपैकी एका विशिष्ट वर्गासच परिस्थितीची झळ जास्त लागत आहे, हें दाखवून दिलें आहे. विशेषांकांतील कांहीं लेखांचाच येथें उल्लेख केला आहे, तथापि सर्वच अंक उत्कृष्ट रीतीनें संपादन केलेला व माहितीपूर्ण असा आहे. किं. २ रु. ८ आ.

---

## दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲ. सोसायटी लि., पुणें

१९४६ सालीं वरील विमा कंपनीनें वार्षिक २९,६७६ रुपये हप्त्यांच्या, ५,००,७५० रुपये किंमतीच्या ३२७ पॉलिसी दिल्या. रिन्युअल खर्चाचें प्रमाण फक्त १३.९% पडलें. हप्त्यांतील तरतुदींपेक्षां हें पुष्कळच कमी आहे. विमा खाती फंडांत ४९ हजारांची भर पडून तो १ लक्ष, ४७ हजार रु. झाला आहे. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर ग्रेट ब्रिटनमध्यें तेथील विमा कंपन्यांचें काम अवलोकन करण्यासाठी गेले आहेत; त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा त्यांचें स्वदेशीं आगमन झाल्यावर कंपनीस पुष्कळ होईल, असा डायरेक्टरांस विश्वास आहे. ३१ डिसेंबर १९४६ अखेरचें कंपनीचें मूल्यमापन ॲक्चुअरी श्री. के. ए. पंडित ह्यांनीं केलें आहे. मूल्यमापनाचे तारखेस कंपनीकडे १८ लक्ष, ६३ हजारांचे १,२९९ विमे चालू होते. ३% व्याजाच्या व १९% खर्चाच्या आधारावर मूल्यमापन करण्यांत आलें आहे, आणि खर्चाचें प्रमाण वाढलें तरी त्यास वाव असावा म्हणून पुढील पांच वर्षांसाठी १४ हजारांची तरतूद मूल्यमापनांत केलेली आहे. इतकेंहि करून फक्त ३,५५० रु. तूट आढळत आहे. १९% चे आंत खर्च राहिला, तर ही तरतूद पुढें वाढावाच दाखवील. औंध म्यूच्युअलचाच खर्च वाढेल म्हणून ही तरतूद केलेला नसून, सर्वच कंपन्यांस लागू पडणारीं कारणें औंध म्यूच्युअललाहि लागू पडतील व कदाचित् खर्चांत वाढ होईल, त्याची तरतूद ॲक्चुअरीनें करून ठेवलेली आहे, औंध म्यूच्युअलच्या खर्चाच्या अनुभवावरून ही तरतूद केलेली नाहीं, हें कंपनीच्या चेअरमननीं मुद्दाम स्पष्ट करून सांगितलें आहे. मूल्यमापनाचा हा रिपोर्ट विमेदारांस समाधानकारक वाटेल.

---

## सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची पूर्व तयारी

एक हजार किंवा त्यापेक्षा ज्यास्त वस्तीच्या प्रत्येक खेडेगांवांत जून, १९४७ पासून सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचा आपला निर्धार मुंबई सरकारनें मागेंच व्यक्त केला होता. जीं जिल्हा-लोकल बोर्डें आपली लोकल फंड पट्टी रुपयांत ३ आणे करून त्यांतील १५ पै प्राथमिक शिक्षणासाठी राखून ठेवतील, त्या बोर्डांचा सक्तीच्या शिक्षणासाठी येणारा जादा खर्च सरकार सोशील, असें सरकारनें नोव्हेंबर १९४६ मध्यें जाहीर केलें. त्याप्रमाणें २० बोर्डांपैकी ज्या ८ बोर्डांनीं तरतूद केली आहे, त्यांनीं जून, १९४७ पासून सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करावें व बाकी बोर्डांनीं त्यांचें सत्वर अनुकरण करावें असें सरकारनें सुचविलें आहे.

---

## विक्री-करांतील विसंगतपणा दूर कसा होईल ?

लेखक:-श्री. स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल. बी.

प्रांतिक कारभाराची सत्ता लोकप्रतिनिधींचे हातीं आल्यापासून सार्वजनिक हिताच्या कामांना महत्त्व आलें. परंतु त्या कामांसाठीं लागणारा पैसा चालू उत्पन्नांतून मिळणें दुर्घट होऊं लागलें. तेव्हां साहजिकच नव्या करयोजना काढण्याकडे प्रांतिक सरकारांचें लक्ष लागलें. विक्रीवरील कर ही अशीच एक उत्पन्नाची बाब प्रथमतः मद्रास सरकारनें उपयोजिली व त्यानंतर बंगाल, पंजाब, मुंबई, ओरिसा, आसाम, सिंध, मध्यप्रांत वगैरे प्रांतांत तो कर बसविण्यांत आला. हळूहळू बाकीच्या प्रांतांतहि हा कर अंमलांत येईल असा आतां रंग दिसत आहे.

जनतेकडून ह्या कराचें स्वागत कधींच झालेलें नाहीं; नव्हे, पुष्कळ ठिकाणीं त्याला कडवा विरोध करण्यांत आला. अंमलबजावणीच्या कामांत आलेल्या अडचणीहि कांहीं कमी नाहींत. जनतेकडून ह्या कराच्या नांवानें वसूल केलेला किती पैसा प्रत्यक्ष सरकारी तिजोरींत जमा होतो व वसुलीचा खर्च किती होतो हें सांगतां येणें कठीण आहे. ह्या करानें जनतेला झीज व व्यापाऱ्यांना जिकीर उत्पन्न केली आहे. पण एवढ्यानेंहि भागलेलें नाहीं. ज्या आठ प्रांतांत हा कर प्रचलित आहे त्यांमध्यें ह्या कराच्या अंमलबजावणीच्या पद्धतींत अनेक फरक आहेत. कोठें तो एकूण उलाढालीवर; कोठें किरकोळ विक्रीवर; कोठें त्याच मालाच्या प्रत्येक व्यवहारावर अथवा हातबदलीवर; कोठें कांहीं पदार्थ करमुक्त ठरवून, तर कोठें एकहि पदार्थ करमुक्त न ठरवितां आकारला जात आहे. त्यामुळें आंतर-प्रांतीय व्यापारांत अनेक घोटाळे उत्पन्न झाले आहेत.

व्यापाराचा ओघ साहजिकच कमी कर असलेल्या प्रांतांकडे वळतो. त्यामुळें कराचें प्रमाण भारी असलेल्या प्रांतांना व्यापारास मुकावें लागतें; व तेथील सरकारांचें उत्पन्नहि घटतें. यामुळें आज जो प्रांताबाहेर जाणाऱ्या मालावर कर नाहीं तो बसवावा कीं काय असा पेंच कित्येक प्रांतांना पडला आहे.

ह्या तऱ्हेचे फरक कायम राहिल्यास देशांतल्या देशांत व्यापार व्यवहारांना जें मुक्तद्वार व सौकर्य असावयास पाहिजे तें अजिबात राहाणार नाहीं. एकाच मालावर अनेक वेळां कराची आकारणी झाल्याचीं उदाहरणें घडत आहेत. प्रत्येक प्रांतानें स्वतंत्रपणें ह्या कराच्या अंमलबजावणीच्या आपआपल्या योजना ठरविल्याकारणानें प्रस्तुतची विसंगतता निर्माण झाली आहे.

सर्व हिंदुस्थानभर एकाच पद्धतीवर ह्या कराची आकारणी व अंमलबजावणी होणें आवश्यक असून सर्वत्र लागू पडणारा असा एकच निश्चित अर्थाचा आणि सुबोध कायदाहि पसार होणें जरूरीचें आहे. पण ह्या सर्व योजना ठरवितांना हिंदुस्थानांतील धनहीन प्रजेची गैरसोय मात्र होतां कामा नये. गरीब जनतेच्या नित्याच्या जीवनास आवश्यक असलेल्या सर्व वस्तू सर्वत्र करमुक्त ठरविण्यास कांहींच हरकत नाहीं.

---

**आसाममधील क्षयरोग्यांची संख्या** —आसामच्या १ कोटी लोकसंख्येपैकीं सुमारें ६० हजार लोक क्षयरोगानें पछाडलेले आहेत, असें हिंदुस्थान सरकारचे ह्या बाबतींतील सल्लागार कर्नल विश्वनाथन् ह्यांनीं सांगितलें. निर्वासितांची वाढ आणि रहाण्याच्या जागेची दुर्मिळता ह्या कारणांमुळें रोगाचा फैलाव अधिक झाला आहे, असें त्यांचें मत आहे.

कंपनीच्या पहिल्याच वर्षीच्या ऊसगाळणीस सुरुवात होऊन अद्यावत् पद्धतीचा एकजिनसी गूळ तयार होऊं लागला.

**पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लिमिटेड**

रजिस्टर्ड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट-कुरोली, (जि. सोलापूर)

अधिकृत भांडवल : रु. १०,००००० (दहा लाख)
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००००० (पांच लाख)

पुढीलप्रमाणें—१०००—५ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकीं रु. १०० चा. ६००० "बी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. ५० चा. १०००० "सी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. १० चा ("सी" क्लासचे सर्व शेअर्स खपले आहेत.)

—शेअर्सची विक्री चालू आहे—

त्याच्या रकमा पुढीलप्रमाणें मागवयाच्या आहेत.

अर्जासोबत शेअर्सच्या ¼ व अर्जमंजुरीनंतर ¼ व उरलेली रक्कम प्रत्येक कॉलमध्यें तीन महिन्यांपेक्षा कमी अंतर नसलेल्या दोन हप्त्यांनीं.

★ कंपनीस मिरज (ज्यु.) दरबारनें १५ वर्षें इन्कमटॅक्स माफ केला आहे व इतर सवलती देऊन रु. २५,००० चे शेअर्स घेतले आहेत.


★ पहिल्याच वर्षी कंपनी १० टक्के डिव्हिडंड देण्याची हमी घेत आहे.

शेअर-फॉर्म, माहितीपत्रकें यांकरितां वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स् : जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी.

इन्फर्मेशन ऑफिसेस :

पुणें-लक्ष्मी रोड, गणपति चौक, बुधवार, नं. ६२, पुणें २.
पंढरपूर—नवी पेठ, पंढरपूर.



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## सॉलिसिटरांची अमूल्य कामगिरी

मुंबईला आतां स्वतंत्र दिवाणी कोर्टाची स्थापना करण्यांत यावयाची आहे. अजूनपर्यंत मुंबई शहर व उपनगर विभागांतील दिवाणी दावे हायकोर्टाकडूनच ऐकले व निकालीं काढले जात असतात. त्यासाठी मुंबई हायकोर्टाचें काम दोन प्रकारांनीं चालतें. एक ओरिजिनल साइडचें व दुसरें अपेलेट साइडचें. दिवाणी कोर्टाची स्थापना झाली कीं मुंबई हायकोर्टाकडील मूलभूत (ओरिजिनल) काम बहुतेक संपुष्टांत येईल आणि त्याचा परिणाम तात्काळ मुख्यतः मुंबईच्या सॉलिसिटर्सवर मोठा अहितकारक होईल.

मुंबईस सध्यां सुमारें ४०० सॉलिसिटर्स असून ते सुमारें १७५ फर्म्स अथवा पेढ्यांमध्यें गोवले गेलले आहेत. सॉलिसिटर व्हावयाचें तर कायद्याची परीक्षा पास झाल्यावर प्रथम कोणातरी जुन्या सॉलिसिटरकडे तीन वर्षें उमेदवारी करावी लागते व तत्प्रीत्यर्थ सुमारें ४ ते ५ हजार रुपये आगाऊ भरून ठेवावे लागतात. त्यानंतर सॉलिसिटरची परीक्षा द्यावी लागते व ती उत्तीर्ण झाली म्हणजे सॉलिसिटर म्हणून काम करण्यास अधिकार व पदवी प्राप्त होते.

या सॉलिसिटरांच्या पेढ्यांवर उत्कृष्ट प्रकारचे ग्रंथसंग्रह त्यांनीं ठेवलेले असतात, व त्यांत आजतागायतपर्यंतचीं बहुतेक सर्व कायद्याचीं पुस्तकें जमा करून ठेवलेलीं असतात. याचा साहजिकच असा परिणाम होतो कीं मुंबईतील असंख्य व्यापारी व व्यापारी पेढ्या यांची सर्व मदार सॉलिसिटर्सवर असते. कायद्याच्या मर्यादा यथायोग्य राखून धंद्याची सुरक्षितता व प्रगति कशी साधावयाची ह्याचें महत्त्वाचें मार्गदर्शन हा सॉलिसिटरांचा बुद्धिमान वर्ग आपल्या कायद्याच्या ज्ञानाचे व व्यापारी व्यवहारांच्या अनुभवाचे जोरावर नित्य करीत असतो. यामुळेंच लहानमोठ्या व्यापारी उलाढालींचे करारमदार वगैरे विविध स्वरूपाचे कायदेशीर कागदपत्र व्यापारी वर्ग सॉलिसिटर्सकडून करवून अथवा परीक्षून घेतो.

सॉलिसिटर्स हे खुद्द कोर्टांतील काम कमी करतात असेंहि नाहीं. दाव्यांची बहुतेक सर्व पूर्वतयारी व रचना सॉलिसिटर्सच करतात व पुढें कोर्टापुढें प्रत्यक्ष चालवावयाचें पुराव्याचें अथवा समर्थनाचें काम तेवढें बॅरिस्टर्स व वकील यांजकडून होत असतें. परंतु कोर्टांतील कामापेक्षांहि उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत त्यांचा वावर व कामगिरी एवढी मोठी असते कीं सॉलिसिटर्सची पेढी अथवा कचेरी म्हणजे मुंबईसारख्या शहरांतील व्यापारधंद्यांच्या क्षेत्राचें एक अत्यंत महत्त्वाचें व अविभाज्य अंगच होऊन बसलेलें असतें.

सॉलिसिटर्स म्हणजे एक प्रकारें व्यापारी, त्यांच्या संस्था व पेढ्या यांचे दप्तरदारच असतात. पूर्वी झालेल्या अनेक व्यवहारांचे असंख्य कागदपत्र सॉलिसिटरांनीं राखून ठेवलेले असतात. नवे व्यवहार ठरवितांना हे मागील दाखले फार उपयोगी पडतात. एकप्रकारें सॉलिसिटर्सच अशीं दप्तरें चांगलीं संभाळूं शकतात. सामान्य व्यापाऱ्यांच्या हातून हें काम होणें नाहीं. सॉलिसिटर्सनीं या कार्यांत पारंगतता प्राप्त करून घेतलेली असते. गुंतागुंतीच्या स्वरूपाचे व्यवहार असले कीं सॉलिसिटर्सच्या सल्ल्यानेंच ते व्हावयाचे. इतका त्यांचेवर व्यापारी चालणाऱ्यांचा व पेढ्यांचा विश्वास असतो.

दिवसानुदिवस अधिकाधिक होत असलेली देशांतील व्यापार व उद्योगधंदे यांची प्रगति सॉलिसिटर्स लोकांचें महत्त्व वाढविण्यास कारणीभूत झाली आहे. नवीन नवीन निघणाऱ्या पेढ्या व मर्यादित भांडवलाच्या कंपन्या यांचे बनावास सॉलिसिटर वर्गाचा हातभार लागलेला आहे १९४५ व १९४६ या दोन्ही सालांत १,१०० नव्या लिमिटेड कंपन्या व ३,५०० भागीदारी पेढ्या व व्यापारी संस्था मुंबईत राजिस्टर झाला. या कंपन्यांना स्वतःचे स्वतंत्र सॉलिसिटर अथवा वकील नेमून त्यांजकडून आपल्या व्यवहारांचे कागदपत्र व दस्तऐवज तयार करणें, करारमदार करणें, कोर्टांतील व अन्य कायद्याचीं कामें करून घेणें सोयीचें होतें. अशा प्रकारची पद्धतहि चालू आहे.

अशा प्रकारें मुंबईतील सॉलिसिटर्स वर्गाचे व व्यापारी मंडळींचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे व घनिष्ठ असून परस्परांचा परस्परांवर मोठा लोभ व विश्वास आहे.

मुंबईला स्वतंत्र दिवाणी कोर्टाची स्थापना झाली कीं ५,००० रुपयांखालील दावे दिवाणी कोर्टाकडे जातील व हायकोर्टाचें काम त्यामुळें पुष्कळच कमी होईल आणि त्याचा परिणाम सॉलिसिटर्सच्या धंद्यावर फार विघातक होईल. गेल्या आठ वर्षांत हायकोर्टाचें काम कमी झालेलें आहे त्यामुळें सॉलिसिटर्स वर्गांतील प्राप्तीवरील कर भरणारांची संख्या फार कमी झाली आहे.

---

**कपाशीच्या निर्गतीस मोकळीक**— हिंदुस्थानांत कपाशीचा पुरवठा पुरेसा आहे, असें आढळून आल्यावरून हिंदुस्थान सरकारनें हिंदी कपाशीच्या निर्गतीवरील बंधनें काढून टाकलीं आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत ही मोकळीक राहील; निर्गतीसाठी लायसेन्सची आवश्यकता नाहीं. सरकारच्या ह्या निर्णयाचें हितसंबंधी व्यापारी-वर्गानें स्वागत केलें आहे.

**निकेलचा नवा रुपया** — निकेलच्या नव्या रुपयाचें वजन पूर्वीच्या रुपयाइतकेंच असलें, तरी त्याचा व्यास १·२ इंचाऐवजी १·१ इंच आहे.

अनुभवसिद्ध गुणकारी आणि स्वस्त!
१ आणा पाकीट
★ किरण शोधन — श्वासोच्छ्वास साफ करणारें
★ एस. के. टॅब्लेटस — डोकें दुखीवर अप्रतिम
★ किरण टूथ पावडर — दातांचें आरोग्यासाठीं
★ वि-कास — खोकल्यावर स्वादिष्ट गोळ्या
★ अतल-जीवन — पोटदुखी, अजीर्ण, हगवण इ. वर
★ किरण धूप — डांस, पिसवा इ. नाशक
★ पामा किरण — त्वचा रोगांवर
★ उन्हाळ्याचें औषध — उन्हाळी व लघवीची आग इ. वर
★ किरण ताप गोळ्या — सर्व प्रकारचे तापांवर
★ किरण जुलाब गोळ्या — जुलाब होण्याकरितां
दि सूर्यकिरण फार्मसी लि.
तळेगांव जी. आय. पी.

## म्हैसूर सिल्क फिलेचर्सची नववी वार्षिक सभा

### राजसेवाप्रसक्त श्री. एन. रामराव, ह्यांचें भाषण

म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. ह्या कंपनीचे अध्यक्ष श्री. एन. रामराव यांनीं कंपनीच्या ९ व्या वार्षिक सभेंत कंपनीच्या व्यवहाराबाबत पुढील विचार व्यक्त केले:—

" नऊ वर्षांपूर्वी कंपनीनें धंद्याला प्रारंभ केला तेव्हां त्या क्षेत्रांत आपली कंपनी एकटीच होती. पण दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर सरकारनें पॅरेशूटला लागणारें रेशिम तयार करण्यासाठी ह्या धंद्याला उत्तेजन दिल्यामुळें अनेक उत्पादक घटक निर्माण झाले. आपलें सर्व उत्पादन कराराप्रमाणें सरकार घेत असल्यामुळें आपणास फायद्याचा वाव फारसा उरला नाहीं हें खरें; परंतु त्याचबरोबर बाजारपेठेंत माल उठवण्याची आपली दगदगही कमी झाली. युद्ध चालू असेतोंपर्यंत आपणांस परदेशांची स्पर्धाही सोसावी लागली नाहीं. रेशमाच्या किड्यांचे कोष किंमतीच्या नियंत्रणाखालीं आणण्यांत आले. एकंदरीनें युद्धकाळांत आपण संरक्षित होतों. युद्धानंतर सरकारनें कोषावरील किंमतीचें नियंत्रण उठविलें; त्यामुळें नव्या कंपन्या निघाल्या त्यांतील कांहीं बुडाल्या आणि एकंदरीनें रेशमाचा बाजार बराच अस्थिर झाला. त्यामुळें म्हैसूर दरबारनें हिंदुस्थान सरकारची संमती न घेतां एकतर्फी आणि अनिष्ट अशा कमाल किंमती ठरविल्या. अखेर या नियंत्रणांची अनिष्टता ओळखून म्हैसूर सरकारनें त्या रद्द केल्या. देशांतील राजकीय व जातीय परिस्थितीमुळेंही कंपनीला इतर धंद्यांप्रमाणेंच त्रास सहन करावा लागला. तथापि ह्या सर्व अडचणींतून मार्ग काढून १२½ टक्के करमाफ डिव्हिडंड कंपनी वाटूं शकली. पुढील काळ अनिश्चित असला तरी कंपनीची भरभराट होण्यास अडचण पडणार नाहीं, असें मला वाटतें."

---


## पिकासाठीं दिलेल्या कर्जाचे वसुलीबाबत जाहीर खबर


बागलाण व कळवण तालुक्यांतील ज्या सहकारी सोसायट्यांचे मेंबरांनीं पिकासाठीं कर्ज गेले सालीं घेतलेलें आहे, त्यापैकीं कांहीं सभासदांनीं उत्पन्न येऊन माल विक्री करूनही अजून वसूल लावलेला नाहीं. तरी ज्यांनीं माल विक्री केला असेल त्यांनीं ताबडतोब वसूल लावण्याचें करावें व ज्यांनीं माल विक्री केला नसेल त्यांनी कायद्याप्रमाणें सहकारी संस्थेमार्फतच माल विक्री करून वसूल ताबडतोब लावण्याचें करावें. जर इतकेंही करून वसूल दिला नाहीं, तर ज्या संस्थेकडून पिकासाठीं म्हणून कर्ज घेतलें असेल त्या संस्थेकडून लवकरच कर्ज निवारण कायदा कलम ७७ प्रमाणें कायदेशीर इलाज होणार आहेत. अशी ही धोक्याची सूचना असून अशी वेळ येऊं देऊं नये.


आतांपर्यंत वसूल न लावण्याचें कारण गूळ विक्री झाली नाहीं, असें बऱ्याच सभासदांकडून सांगण्यांत आलें. ह्याबाबत सर्व शेतकऱ्यांना असेंही कळविण्यांत येतें आहे कीं, सरकारतर्फे सटाणा कोऑपरेटिव्ह सेल परचेस युनियनला गूळ खरेदी करणेची एजन्सी मिळाली असून सदर संस्थेमार्फत गूळ खरेदीचे कामास सुरवात झाली आहे. तरी सर्व सभासदांनीं व शेतकरी बंधूंनीं याच एजन्सीमार्फत आपला माल विकून मालाचें वजन व किंमत बरोबर पदरांत पाडून घेण्याचें श्रेय मिळवावें.

एस. एन. ठोके

असिस्टंट डिस्ट्रिक्ट कोऑपरेटिव्ह
ऑफिसर फॉर डेट रिलीफ, सटाणा





पेडणेकर आणि कंपनी लि.,
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२, गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८









## मुंबई शेअर बाजार

+ व्याज वजा

( वि. म. किमये आणि मं. यांजकडून )

सातांहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † बोनस S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १०।६।४७ | बुधवार ११।६।४७ | गुरुवार १२।६।४७ | शुक्रवार १३।६।४७ | सोमवार १६।६।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९७८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २०४० | १९८० | | | २०५०-० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा ऑर्डिनरी | ७५ | ३९६-८ | ३८८-८ | | | ३९९-८ |
| ६५; ३६-४ | ०-८- S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २९-६ | २८-१२ | | | २९-६ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३६-४ | ३४-१४ | | | ३५-१० |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०७५* | १०७२-८ | | | ११२५ |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६४२ | ६२९ | | | ६३९-० |
| ९९६; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६३० | ६३४ | | | ६५५-० |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३०९ | ३१७ | | | ३११-० |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३०८ | ३०९ | | | ३१९ |
| ५७१; ३२३ | १२-०- S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३२० | ३१८ | | | ३२५ |
| ५९४; ३२५- | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३४९ | ३४६ | | | ३५९ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-३ | ४-४-६ | | | ४-५ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६-८ | १६-८ | | | १६-१४ |
| ६-११ ६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड | १ | ३-०-६ | ३-१ | | | ३-०-६+ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा. | १०० | ५६० | ५५८-१२ | | | ५६७-८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १७५-८ | १७४ | | | १७४-० |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २७० | २६९ | | | २७४-० |
| ६१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४८७-८ | ४८१-४ | | | ४८७-८ |
| ६०-१० ३६-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३२-४ | ३२-६ | | | ३३-२ |

**ओरिसा प्रांतांत मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—ओरिसा सरकारनें आपल्या प्रांतांतील मोटारवहातुकीचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी एक लिमिटेड कंपनी स्थापन करण्यांत येईल. तिचे बहुसंख्य भाग मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांच्या हुकमतीखाली रहातील.

**गिरणीकामगारांचें किमान वेतन**—इंडस्ट्रिअल कोर्टानें मुंबईमधील कपास गिरण्यांतील कामगारांच्या किमान वेतनांत वाढ करून दिली आहे, तिचेमुळें सुमारें २½ लक्ष कामगारांना मिळून सालिना २ कोटि रुपये जास्त मिळतील. प्रत्येकास किमान दरमहा ३० रुपये व १९४६ च्या त्याच्या प्राप्तीच्या एक पंचमांशाइतका बोनस मिळाला पाहिजे, असा इंटस्ट्रिअल कोर्टाचा निवाडा आहे. कामगारांना हा निवाडा असमाधानकारक वाटत आहे आणि गिरणी मालकांवर जादा खर्च बसत आहे. त्याचें लोण गिऱ्हाइकांपर्यंत लवकरच पोंचल्याविना रहाणार नाहीं.

**इंग्लंडमधील पोलादाचा कारखाना हिंदी भांडवलवाल्यांचे हातीं येणार**—शेफील्ड, यॉर्कशायर, येथील फिट्झविल्यम वर्क्स ह्या पोलादाच्या कारखान्याची मालक, हार्विन्स लि, ह्या कंपनीचे सर्व ऑर्डिनरी भाग राहन स्टील लि. ही कंपनी विकत घेत आहे. खरेदीदार कंपनीचे बहुसंख्य भाग हिंदी लोकांच्या मालकीचे आहेत.

**पोलंडची जागतिक बँकेकडे कर्जमागणी**— पोलंडनें जागतिक बँकेकडे ६० कोटि डॉलर्सचें कर्ज मागितलें आहे. कर्जमागणीच्या अर्जाचा विचार करण्यापूर्वी बँकेनें आपले कांहीं अधिकारी जाग्यावर जाऊन चौकशी करण्यासाठी पोलंडकडे पाठविले आहेत.

**छपाईच्या कागदाचें उत्पादन वाढलें**—अमेरिकेंतील न्यूज-प्रिंटचें उत्पादन वाढलें आहे. मार्च, १९४७ मध्यें ६८,१०१ टन उत्पादन झालें होतें. एप्रिल १९४७ मध्यें तें ७१,२८३ टनांवर गेलें.

**हिंदी रेल्वेजच्या खर्चांत वाढ**— हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक तयार केल्यानंतर चालू वर्षी रेल्वेजना ४३ कोटि रु. ज्यास्त खर्च येणार आहे. पे कमिशनच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळें खर्चांत २५ कोटि रुपयांची वाढ होईल आणि ३१ मार्च, १९४७ अखेरच्या तिमाहीबद्दल ६ कोटि रुपये द्यावे लागतील. ॲडज्युडिकेटरच्या निवाड्यामुळें ६½ कोटींचा बोजा बसणार आहे. कोळशासाठी ३ कोटि रुपये ज्यास्त द्यावे लागतील आणि घसारा फंडांत जादा २½ कोटि रुपये वर्ग करावे लागतील. ४३ कोटि रुपयांच्या जादा खर्चाचा हा तपशील रेल्वे सभासद, डॉ. जॉन मथाई, ह्यांनीं सांगितला आहे.


## DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA.

( Recognised by Government ).

Classes for the 1947-48 Session will begin on Thursday the 26th June 1947. Students coached up for G. D. C. & C., D. Com. ( I. M. C. ), R. A. ( 1st ), G. D. C. & A., Indian Institute of Bankers, Shorthand and Typewriting. Courses suitable for Graduates, Matriculates and Non-Matriculates. Classes in the morning and evening. Prospectus free on application to :

257, C, Budhwar Peth,
Opp. Pharaskhana Haud,
Poona City.

Secretary.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,०५,५९५
खेळतें भांडवल रु. ६१,००,०००

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल्. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

श्री—श्री—श्री—श्री—श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री—श्री—श्री—श्री—श्री

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.